॥ पांडुरंग कांती ॥

गायिकाः आशा भोसले
अभंगः संत ज्ञानेश्वर
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

पांडुरंग कांती। दिव्य तेज झळकती
रत्नटिळ फाकती। प्रभा ॥

अगणित लावण्य। तेज पुंजाळले॥
न वर्णवे तेथिची। शोभा ॥

कानडाऊ विठ्ठलू। करनाटकू॥
तेणे मज लावियेला। वेधू ॥

खोळ बुंथि घेऊनि। खुणाची पालवी॥
आळविल्या नेदि। साधू ॥

क्षेमालागि जीव। उताविळ माझा॥
म्हणवूनि स्फूरताती। बाहो ॥

क्षेम देऊ गेले तव। मीची मी एकली॥
आसावला जीव। रावो ॥

पाया पडू गेले तव। पाऊलचि न दिसे॥
उभा कि स्वयंभू। असे ॥

समोर कि पाठिमोरा। नकळे॥
टकची पडिले। कैसे ॥

बापरखमादेविवरू हृदयीचा जाणोनि। अनुभव सौरसू केला॥
दृष्टिचा डोळा पाहो गेलिये। तव भितरि पालटो झाला ॥